**प्रवास**

तुझं आणि माझं
माळरानात भटकणं
हातात हात न घेता
फक्त एकत्र चालणं.|
हुळहुळणाऱ्या पातीचा
स्पर्श कोमल दोघांना
तुझ्या संथ श्वासांचा
छंद माझ्या पावलांना.|
दूर दूर वाटेवरती
प्रकाश कळ्या शिंपलेल्या
तुझ्या माझ्या मौनावरती
खळाळून हसलेल्या.|
हसुनी घातला मधेच खोडा
खट्याळ अल्लड वेडा ओढा
सहजचि आला हात तुझा अन
नकळत पडला मनास वेढा.|
मावळतीचे दीप बिलोरी
एकमेकांना हळू खुणावी
आधाराची एकच वेलट
दोघांनाही कशी पुरावी?.|
ओलांडले  क्षणात नाते
उंच उडाला लज्जा पक्षी
लपवलेली तरी ही उमटली
सावल्यांची थरथर नक्षी.|
गुंफलेल्या हाती तुटती
वेल रानीची तरुण कोवळी

ती हि गुंतून पडली पायी
ओल्या बुजल्या मिठीत जवळी.|
आवरेना, सावरताना
पुन्हा एकदा पाय घसरला
अदृश्य निसरड्या वाटेवरती
एकांताचा प्रवास अपुला |

**------संध्या रानडे**